कार्यालयीन परिपत्रक क्र. : ३०

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
दिनांक : ११/१०/२०२४.

विषय : क्लर्क (ज्युनियर ग्रेड क्लर्क, लिपीक) या १०० पदांसाठी खातेअंतर्गत अर्ज.

संदर्भ : १) सन २०१३ चा मंजूर आस्थापना आराखडा ठराव क्र.४८, दि. ०२/०८/२०१३.
२) मा. संचालक मंडळ ठराव क्र. ०६, दि. १७/११/२०१८.
३) ॲडमिन विभागाकडील दि. २६/०६/२०२४ रोजीची मान्य बढती साखळी.
४) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे दि. ०१/०९/२०२४ रोजीचे आदेश व आरक्षण धोरणानुसार खातेअंतर्गत अर्ज मागविणेबाबत मा. सहव्यवस्थापकीय संचालक यांचे दि. ०७/१०/२०२४ रोजीचे आदेश.
५) मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची आरक्षण टक्केवारी मान्य टिपणी दि. १०/१०/२०२४.

परिवहन महामंडळाचे जनरल ॲडमिन विभागाकडील मान्य बढती साखळीचे अनुषंगाने क्लर्क (ज्युनियर ग्रेड लेखनिक) हे पद खातेअंतर्गत अर्ज मागवून भरणेबाबत संदर्भ क्र. ४ व ५ ने आदेशित करणेत आले आहे.

जनरल ॲडमिन विभागाकडील मान्य बढती साखळीनुसार क्लर्क (ज्युनियर ग्रेड क्लर्क, लिपीक) या पदाची वेतनश्रेणी १९९००-६३२०० (एस-६) अशी असून सदरचे पद ॲडमिन, वाहतुक, वर्कशॉप विभागातील कायम कर्मचाऱ्यांकडून खातेअंतर्गत अर्ज मागवून भरणेकामी खालीलप्रमाणे अर्हता निश्चित करणेत आली आहे.

१. दि. १/८/२०१४ नंतर सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना मान्यता प्राप्त विद्यापिठाची पदवी पास. तसेच दि. ३१/७/२०१४ रोजी किंवा तत्पूर्वी सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांना १० वी पास.
२. कायम जागेवर ३ वर्षे कामाचा अनुभव.
३. मे. शासनाचे जीसीसी मान्यताप्राप्त टंकलेखन इंग्रजी-४०, मराठी-३० शब्द प्रती मिनिट आवश्यक.
४. संगणकीय ज्ञान (एमएससीआयटी) आवश्यक.
५. हजेरी व सर्व्हिस रेकॉर्ड समाधानकारक.
६. सेवाजेष्ठता.

क्लर्क (ज्युनियर ग्रेड लेखनिक) या १०० रिक्त पदांसाठीचे आरक्षण खालीलप्रमाणे आहे.

| अजा (SC) | अज (ST) | विजाअ (VJA) | भज-ब (NTB) | भज-क (NTC) | भज-ड (NTD) | विमाप्र (SBC) | इमाव (OBC) | साशैमाप्र (SEBC) | आदुघ (EWS) | खुला (OPEN) | एकुण Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १३% | ७% | ३% | २.५०% | ३.५०% | २% | २% | १९% | १०% | १०% | २८% | १००% |
| १३ | ७ | ३ | ३ | ३ | २ | २ | १९ | १० | १० | २८ | १०० |

उपरोक्त नमूद अटी शर्तीनुसार जे कर्मचारी क्लर्क (ज्युनियर ग्रेड क्लर्क, लिपीक) या पदासाठी पात्र असतील, अशा कर्मचाऱ्यांनी त्यांचे विहीत नमुन्यातील लेखी अर्ज कागदपत्रांसह महामंडळाच्या मुख्य इमारतीतील बारनिशी विभागात दि. २२/१०/२०२४ अखेर पर्यत सादर करावेत. विहीत नमुन्यामध्ये नसलेले व मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

अर्ज सादर करणेसाठी सर्व साधारण अटी शर्ती खालीलप्रमाणे :

१. क्लर्क (ज्युनियर ग्रेड लेखनिक) या १०० पदासाठी अर्ज करणेस वाहतुक, प्रशासन व वर्कशॉप विभागातील कर्मचारी पात्र राहतील. अपूर्ण व कागदपत्रांची पुर्तता नसलेला अर्ज सादर करू नये, सादर केल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.
२. विभागीय बढती समिती मार्फत निवड.

३. पात्र अर्जदारांची संगणक परिक्षा, लेखी परिक्षा व मुलाखत घेणेबाबतचा सर्वस्वी निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.

४. क्लर्क (ज्युनियर ग्रेड लेखनिक) पदावर नियुक्त करावयाच्या कर्मचारी संख्येबाबतचा अंतीम निर्णय मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचा राहील.

५. या परिपत्रकाद्वारे नेमणूक करणे महामंडळावर बंधनकारक नाही.

६. दिव्यांग व अनुकंपा कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्जात दिव्यांग /अनुकंपा असलेबाबतचा उल्लेख करावा. तसेच दिव्यांग कर्मचाऱ्यांनी दिव्यांगत्वाचा दाखल अर्जासोबत सहपत्रित करावा.

७. विभागीय बढती समितीची शिफारस व क्लर्क (ज्युनियर ग्रेड क्लर्क, लिपीक) पदासाठी महामंडळाचे आवश्यकतेनुसार नेमणूका करणेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

८. अर्जदार कर्मचाऱ्यांनी रू. २००/- पेटी कॅश विभागात भरून त्याबाबतची पावती अर्जा सोबत जोडणे आवश्यक आहे. भरणा पावती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच काही कारणास्तव जाहिरात रद्द केल्यास महामंडळाकडून सदरची रक्कम परत दिली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

(मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे मान्यतेने)

(नितीन नार्वेकर)
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

दिनांक : / /२०२४.

मा. डेप्यूटी चिफ मॅनेजर (ॲडमिन),
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

यांजकडेस सविनय सादर...

## कार्यालयीन परिपत्रक क्र. ३०, दि. ११/१०/२०२४ अंतर्गत क्लर्क (ज्युनियर ग्रेड लेखनिक, लिपीक) या पदासाठी खातेअंतर्गत अर्ज.

अर्जदार : (नाव), (हुदद्दा), (क्रमांक), (कामाचे ठिकाण).

मा. महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून क्लर्क (ज्युनियर ग्रेड लेखनिक, लिपीक) पदाचे खातेअंतर्गत भरतीकरीता मी अर्ज करीत असून माझी माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | शिर्षक | | तपशील |
|---|---|---|---|
| ०१ | संपूर्ण नाव | | |
| ०२ | हुदद्दा व क्रमांक | | |
| ०३ | मोबाईल क्रमांक | | |
| ०४ | सध्या कामाचे ठिकाण | | |
| ०५ | कामाचे स्वरूप | | |
| ०६ | जात प्रवर्ग | | |
| ०७ | नेमणूक | | अनुकंपा / सरळसेवा |
| ०८ | दिव्यांग | | आहे / नाही |
| ०९ | शिक्षण | १० वी पास | आहे / नाही |
| | | एमएससीआयटी | आहे / नाही |
| | | पदवी | आहे / नाही |
| | | इतर | |
| १० | टंकलेखन | इंग्रजी ४० शब्द प्रति मिनीट | आहे / नाही |
| | | मराठी ३० शब्द प्रति मिनीट | आहे / नाही |

वरील सर्व माहितीची स्वयं:साक्षांकित प्रमाणपत्रे (शिक्षण, एमएससीआयटी, पदवी, टंकलेखन इ.) सोबत सहपत्रित केली आहेत. सदरची माहिती खोटी / अर्धवट असल्यास मला देण्यात येणारी नेमणूक रदद् करण्याचा पूर्ण अधिकार मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना असतील.

(स्वाक्षरी)
(संपूर्ण नाव)

---

### कार्यालयीन कामकाजाकरीता

| अ.क्र. | शिर्षक | तपशील |
|---|---|---|
| ०१ | हंगामी पदावर रूजू दिनांक | |
| ०२ | सेवा कालावधी | |
| ०३ | सेवापुस्तकानुसार अनुकंपा नेमणूक | आहे / नाही |
| ०४ | सेवापुस्तकानुसार दिव्यांग नेमणूक | आहे / नाही |
| ०५ | दिव्यांग असल्यास टक्केवारी | |
| ०६ | इतर | |

वरील माहिती व अर्ज मी तपासला असून सर्व माहिती बरोबर आहे.

(स्वाक्षरी)
(क्लर्क सेवकाचे नाव)